E..41

# मा.दिवाणी न्यायाधिश साहेब,वरिष्ठ स्तर,कोर्ट,गंगाखेड

दि.दा.क्र.370/2024

वादी : राजन

**विरूध्द**

प्रतिवादी : शोभाबाई व इतर

वाद :शाश्वत मनाई आज्ञा हुकूम व मालकी घोषीत करणे व इतर

**शपथपत्र {साक्षपुराव्याचे }**

ORDER
Read & Recorded

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2026.02.24 17:31:05 +0530

CJSD,Gangakhed

मी **श्रीमती मनिषा भ्र.भिमराव साळवे**,वय: 44वर्षे,धंदा : घरकाम व शेती रा.कृष्ण नगर, गंगाखेड ता.गंगाखेड जि.परभणी शपथेवर निवेदन करते की, मी व माझे मुलातर्फे विदयमान न्यायालयात वादातील जमिनीची मालकी जाहिर करण्यासाठी व मनाई हुकूम व इतर मागणीसाठी वादपत्र दाखल केले आहे.

शपथेवर निवेदन करते की, वादातील जमिन ही सर्व्हे नं.254/1 क्षेत्र 1 हे 34 आर मौजे गंगाखेड ज्याची चतूसिमा वादपत्रात दर्शविल्या प्रमाणे आहे ही जमिन राजन व वैष्णवी यांचे आजोबाची जमिन आहे. सर्व्हे नं.254/1 मध्ये एकुण जमिन 10 एकर 10 गुंठे ही आमचे आजोबा तुळशीराम यांना 1970 मध्ये शासना तर्फे मिळाली होती त्याप्रमाणे वादी क्र.1 व 2चे आजोबा तुळशीराम यांचा फेर फार क्र.1075 दि.11.11.1970 रोजी मंजुर झाला होता. वादी क्र.1 व 2 चे आजोबा मयत झाले व मयतानंतर तुळशीराम यांचे वारस वादीचे वडील भिमा,चुलते संभा व शेषेराव व आजी लिंबाबाई यांचे नावे 1992 साली वारस फेर फार अधारे लागली व वादीचे वडील चुलते व आजी यांचे नावे 10 एकर 10 गुंठे लागली, वादातील सर्व्हे नं.254 मधील 10 एकर 10 गुंठे पैकी 6 एकर 32 गुंठे जमिन वादीचे वडील व इतर वारसांनी शासनाची परवानगी घेवून एन. ए केला सदर एन.ए.ची अकृषिक परवानगी घेतली

Superintendent
C.J.S.D.Court.
Gangakhed

आहे. सदर एन.ए.चा परवाना मयत तुळशीरामची पत्नी लिंबाबाई यांचे नावे असुन 06 एकर 32 गुंठे जमिन विक्री देखील झाली आहे.

मी शपथेवर निवेदन करते की, उपविभागीय अधिकारी यांनी दि.23.02.2021 रोजी प्रतिवादी क्र.5 यांनी प्रतिवादी क्र.4 तहसीलदार साहेब यांना असे पत्र दिले की, स.नं.254/4 मधील क्षेत्र 3 हेक्टर 86 आर एवढी जमिन जलसंपदा विभागाने संपादीत केलेली आहे तशी नोंद घेण्यात यावी अशी विनंती केल्यानंतर कार्यवाही होवून स.नं.254/4 मधील क्षेत्र 3 हे.86 आर फेर फार नं.15068 मंजुर करुन दि.12.03.2021 ला सातबारा रेकॉर्डला नोंद देखील झाली आहे परंतू वरील जमिन जलसंपदा विभागाने कधी संपादीत केली, कोणत्या स्पेसिफिक सर्व्हेनंबर मधील केली. या संदर्भात वादीने प्रतिवादी क्र.4 व 5कडे केली असता त्यांनी वादीला काहीही स्पष्टीकरण दिलेले नाही. म्हणुन ही माहिती प्रतिवादीकडुन मागविणे जरुरी आहे.

मी शपथेवर निवेदन करते की,जलसंपदा विभागाने त्यांचे नावे 3 हे.86 आर लागल्यानंतर प्रतिवादी क्र.4 तहसीलदारने वादीचे वडील भिमा,चुलते संभा व शेषेराव व आजी लिंबाबाई यांचे सर्व्हे नं.254/1 मधील क्षेत्र 1 हे 34 आर हे क्षेत्र कमी केले व तेथे जलसंपदा विभागाचे नावे बेकायदेशिर महाराष्ट्र महसुल अधिनियम 1966 कलम 155 तहत दि.30.09.2021 रोजी आदेश घेवून फेर फार क्र.16547 हा बेकायदेशिररित्या दि.01-10-2021 रोजी मंजुर केला. जलसंपदा विभागाची मागणी नसताना आमची वादीची वादातील जमिन बेकायदेशिर कमी केली त्यामुळे प्रतिवादी तहसीलदार यांचा आदेश बेकायदेशिर असल्याचे जाहिर करावे. आम्ही वादी सदर तहसीलदारने केलेला चुकीचा फेर फार रदद करण्यासाठी एस.डी.एम. येथे अपिल दाखल केले ते दि.29-10-2021 रोजी दाखल केले आहे.

Superintendent
C.J.S.D.Court
Gangakhed

मी शपथेवर निवेदन करते की, प्रतिवादी क्र.1 व 2 वादीच्या शेताचे दक्षिणेकडील शेजारी आहेत. सर्व्हे नं.254/2 चे शेजारी आहेत. प्रतिवादी क्र.1 व 2 ने शासनाची जमिन हस्तांतर करणेसाठी परवानगी प्रतिवादी क्र.3 कलेक्टरकडे अर्ज दिला होता व काही रक्कम नजराना म्हणुन शासनाकडे भरणा देखील केला होता पण मिन व्हाईल प्रतिवादी क्र.1 व 2 ने संभाजीनगर येथील हायकोर्ट मध्ये रिट दाखल करुन वादातील शेताची कार्यवाही 90 दिवसात करायचा असा आदेश घेतला. व शासनाने सांगितलेल्या घटनेचा भरणा प्रतिवादी क्र.1 व 2 यांनी कलेक्टर ऑफिस मध्ये जमा केला. त्यामुळे प्रतिवादी क्र.1 व 2 ने वादीचे नावे सातबारा रेकॉर्डला जी जमिन होती त्यामध्ये अडथळा,अडीहरकती करण्यास सुरुवात केली व अतिक्रमण करण्याच्या विचारात आहेत. वादातील जमिनीचे क्षेत्र प्रतिवादींनी संगणमत करुन कमी केली तर वादातील क्षेत्रावर वादीचे वडील,चुलते,आजीचा ताबा होता व त्यांचे नंतर वादीचा प्रत्यक्ष ताबा आहे. म्हणुन प्रतिवादी क्र.1 व 2 वादीच्या वादातील जमिनीत अडीहरकती किंवा अतिक्रमण करु नये म्हणुन पाबंद करणे न्याय आहे..वादातील मागणी प्रमाणे पाबंद करावे, वादीचे वडील मयत झाल्यामुळे वादीचे चुलते साथ देत नाहीत त्यामुळे वादातील जमिनीमध्ये वादीच्या हिश्यापादेतो वादीची मालकी जाहिर करावी. वादातील मागण्या वादीचे हिश्याचे हददीपर्यंत मंजुर करुन वादपत्र डिक्री करण्यात यावे.

Superintendent
C.J.S.D. Court
Gangakhed

मी शपथेवर निवेदन करते की,प्रतिवादी क्र.1 व 2 यांनी दि.10.07.2024 ला वादातील शेतीमध्ये अडीहरकती केली व तुमचे नावावरील मालकी ताबा सातबारा वरुन कमी झाला म्हणुन वादीच्या मालकी ताब्यास नकार दिला. त्यामुळे वादींना सदर वादपत्र दाखल करावे लागले आहे. प्रतिवादी क्र1ते 5 संगणमत करुन आहेत व वादींना त्रास देत आहेत, प्रतिवादी क्र.1 व 2 यांनी जो लेखी जवाब दिल

तो खोटा व चुक असल्याने प्रतिवादींना अमान्य आहे. प्रतिवादींनी जी कागदपत्रे तयार केली आहेत  ती चुकीची तयार केली आहे म्हणुन वादीचे वादप व तयामधील मागण्या मान्य करुन वादीचे वादपत्र डिक्री करण्यात यावे.

करीता हे शपथपत्र मी,वादी क्र.1 व 2 तर्फे देत आहे ते बरोबर असुन मला मान्य आहे मी अज्ञान वादीची आई पालनकर्ती आहे.मी अज्ञान वादीच्या विरोधात नाही. मी अज्ञान वादी क्र.2चा योग्य व कायदेशिर पालक आहे.वादी क्र.1 व 2 तर्फे मी हे पुरावा म्हणुन शपथपत्र देत आहे

दिनांक : 24-02-2026 निवेदक

**मनिषा भ्र भिमराव साळवे**

रा.कृष्ण नगर, गंगाखेड

**सत्यापन**

मी निवेदक शपथेवर करतो की, वरील शपथपत्रातील संपूर्ण मजकुर खरा व बरोबर आहे करीता आज रोजी तसदिक करण्यात आली.

दिनांक : 24-02-2026 निवेदक

**मनिषा भ्र भिमराव साळवे**

रा.कृष्ण नगर, गंगाखेड

**AFFIDAVIT**

Solemnly affirmed before me
by Manisha Bhimrao Salve
Age 44 years occu: R/o Gangakhed.
Who is identified before me
by Adv. S. M. Dhore

whom I know personally

24/2/2026

Identified by me
Adv. S. M. Dhore